


शिक्षण शाळा महाविद्यालयातून
तर दिले जातेच. पण त्याचे
लोण खेड्या पाड्यातील गरीबांच्या
झोपडी पर्यंत पोहचविण्याचे
कार्य मी जास्त मोलाचे समजतो.

बापुराव देशमुख



## YESHWANT MAHAVIDYALAY, SELOO

NAAC Reaccredited by **B** Grade

| Ph. 07155-220227 | Email : principal_seloo@yahoo.com | Website : ymseloo.edu.in

यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा द्वारा संचालित

# यशवंत महाविद्यालय, सेलू

(नॅक पुनर्मूल्यांकन 'B' श्रेणी प्राप्त)

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरिता शिक्षणाचे विश्वसनीय केंद्र

## माहितीपत्रक २०१८-१९






यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा द्वारा संचालित

# यशवंत महाविद्यालय, सेलू

(नॅक पुनर्मूल्यांकन 'B' श्रेणी प्राप्त)






## अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालय

**वर्ग ११ व १२ कला**

माहिती तंत्रज्ञान, संगीत

**वर्ग ११ व १२ वाणिज्य**

वर्ग ११ व १२ विज्ञान कम्प्युटर सायन्स

**वर्ग ११ व १२ कला**

आहारशास्त्र वस्त्रशास्त्र (मुलींकरिता)

## वरिष्ठ महाविद्यालय कला विद्याशाखा

**बी.ए. भाग १, २, व ३**

विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीनुसार विषय निवडण्याची सोय.

इंग्रजी वाङ्मय (ELT)

मराठी वाङ्मय (MLT)

**गृहअर्थशास्त्र विषयांतर्गत महिला सेवा केंद्राचे रोजगारभिमुख प्रशिक्षण व कार्यशाळा**














# YASHWANT MAHAVIDYALAYA, SELOO.
# DIST. - WARDHA

NAAC Accredited with 'B' Grade

**VISION**

Our college aim to create an environment for multidimensional growth of the student by organizing various curricular and co-curricular activities because students should be provided with both knowledge and skill so that they can build sustainable careers for themselves.

**MISSION**

Education and knowledge should be made available especially to the economically weak and socially challenged students of the region that they can contribute to national uplift and solve social problems.

## OBJECTIVES

*In tune with our vision and mission statement, we aim to follow the following objectives :*

- ✶ To provide an opportunity of higher education to all the students of this area in general and to economically weak and socially challenged students in particular.
- ✶ To create an environment for all round growth of students.
- ✶ To equip students with up to date knowledge.
- ✶ To inculcate skill and knowledge in tune with requirement of competitive examination.

# महाविद्यालया विषयी

शिक्षणाचे लोण खेडयापाडयातील झोपडीपर्यंत पोहचविण्याचा ध्यास घेतलेल्या श्रद्धेय स्व. बापूरावजी उपाध्य दाआजी देशमुख यांनी १९५९ मध्ये यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेची स्थापना केली. जिल्ह्याच्या ठिकाणी तसेच ग्रामीण भागात शाळा-महाविद्यालयातून शैक्षणिक कार्यात भरीव योगदान देणाऱ्या यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेला 'सर्वोत्कृष्ट शिक्षण संस्था' म्हणून महाराष्ट्र शासनाने पुरस्कार देऊन गौरव केला आहे.

या संस्थेच्या आणि तत्कालीन नागपूर विद्यापीठाच्या मान्यतेने दाआजींनी सेलू-सारख्या गावी २०, जुलै १९७२ रोजी यशवंत महाविद्यालय सुरु केले. साडेचार दशकाची समृद्ध शैक्षणिक परंपरा लाभलेले हे महाविद्यालय आज जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणचे एक नामांकित शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जात आहे. विद्यमान संस्थाध्यक्ष माजी आमदार मा. श्रीमान प्रा. सुरेशभाऊ देशमुख यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयाची योग्य दिशेने वाटचाल सुरु आहे.

महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद (NAAC नॅक), बंगळूरु या स्वायत्त संस्थेद्वारा पुनर्मूल्याकनात 'B' श्रेणीने मूल्यांकित करण्यात आलेले आहे. महाविद्यालयात उच्च विद्याविभूषित, अनुभवी आणि पूर्णकालीन प्राध्यापक असून महाविद्यालयातील परीक्षांचा निकाल व इतर शैक्षणिक प्रगती उत्तम आहे. ती उत्तरोत्तर सर्वोत्तम व्हावी तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी सदैव तत्पर असतात.

## महाविद्यालयाची वैशिष्टये

- सुविद्य, अनुभवी व पूर्णकालीन प्राध्यापक.
- समृद्ध-संदर्भमूल्य ग्रंथांनी सुसज्ज ग्रंथालय व प्रशस्त विद्यार्थी वाचन कक्ष.
- ग्रंथालयात O.P.A.C., इंटरनेट, ई-बुक्स, ई-जर्नलची ऑनलाईन सुविधा.
- इंग्रजी शिकण्यासाठी संगणकांनी अद्यावत (Language Lab) भाषा प्रयोगशाळा.
- मुलींना गृहअर्थशास्त्र विषयांतर्गत स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणारे प्रशिक्षण देण्याची सुविधा.
- गुणवंत विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती व सवलती .
- विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन.
- व्यवसाय मार्गदर्शन, एम.पी.एस.सी. व इतर स्पर्धा परीक्षासाठी ग्रंथालयात अभ्यासिकेची व्यवस्था.
- विविध साधनांनी अद्यावत व्यायामशाळा (GYM)
- प्रशस्त क्रीडांगण सेलू शहरातील मुख्य मार्गावर

# अभ्यासक्रम – कनिष्ठ महाविद्यालय

■ वर्ग ११ व १२ कला ■ वर्ग ११ व १२ वाणिज्य ■ वर्ग ११ व १२ विज्ञान (विनाअनुदानित)

**विज्ञान शाखेत कम्प्युटर सायन्स विषयाची सोय उपलब्ध, कला शाखेत माहिती तंत्रज्ञान (I.T.) व संगीत विषय उपलब्ध. तसेच मुलींकरिता आहारशास्त्र, वस्त्रशास्त्र उपलब्ध**

## अभ्यासक्रम

कनिष्ठ महाविद्यालयात खालील अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. वर्ग ११ व १२ वी साठी कला, वाणिज्य व विज्ञान या तीन शाखा असून ग्रामीण भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या सुप्त कला गुणांना वाव मिळण्यासाठी तसेच स्वयंम रोजगाराच्या दृष्टिने कला शाखेत विषेशतः माहिती तंत्रज्ञान (I.T.) , आहारशास्त्र, वस्त्रशास्त्र, संगीत हे विषय विद्यार्थ्यासाठी उपलब्ध असून विज्ञानशाखेत कम्प्युटर सायंन्स हा विषय घेण्याची विशेष सोय उपलब्ध आहे.

राज्य शासनाच्या नियमानुसार माहिती तंत्रज्ञान (I.T.) हा विषय घेवून इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना एम.एस.सी.आय.टी. या संगणकीय अभ्यासक्रमाच्या समकक्ष समजण्यात येते.

वर्ग ११ वी प्रवेशासाठी विषयांचे गट पाडण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी विषयाच्या गटाचा विचार करुन तुकडीचा पसंतीक्रम आवेदनपत्रात नमूद करावा.

### कला शाखा

| | |
|---|---|
| वर्ग ११ अ | इंग्रजी, मराठी, राज्यशास्त्र, आहारशास्त्र, अर्थशास्त्र समाजशास्त्र/संगीत |
| वर्ग ११ ब | इंग्रजी, मराठी, राज्यशास्त्र, सहकार, इतिहास, समाजशास्त्र/ आय. टी. |
| वर्ग ११ क | इंग्रजी, मराठी, राज्यशास्त्र, सहकार, इतिहास, अर्थशास्त्र |
| वर्ग ११ ड | इंग्रजी, मराठी, समाजशास्त्र, सहकार, अर्थशास्त्र, इतिहास |
| वर्ग ११ इ | इग्रजी, मराठी, राज्यशास्त्र, सहकार, इतिहास, अर्थशास्त्र |

### वाणिज्य शाखा

| | |
|---|---|
| ११ वाणिज्य अ | इंग्रजी, मराठी, अर्थशास्त्र, एस.पी, ओ.सी.एम., बी. के |
| ११ वाणिज्य ब | इंग्रजी, मराठी, अर्थशास्त्र, एस.पी.,ओ.सी.एम., बी. के |

### विज्ञान शाखा

| | |
|---|---|
| ११ विज्ञान | इंग्रजी, मराठी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, जीवशास्त्र, संगणकशास्त्र |

**वर्ग ११ वी मध्ये ज्या तुकडीत प्रवेश मिळाला असेल तीच तुकडी वर्ग १२ वी ला मिळेल.**

## शिक्षण शुल्क

| अ. क्र. | विवरण | शुल्क | |
|---|---|---|---|
| १) | प्रवेश अर्ज व माहितीपत्रक | रु. | ३०.०० |

| अ. क्र. | विवरण | शुल्क | | |
|---|---|---|---|---|
| | | | ११ वी | १२ वी |
| १) | प्रवेश शुल्क : ११ वी कला व वाणिज्य (अनुदानित) | रु. | १६.०० | १८.०० |
| २) | सत्र शुल्क | रु. | ३२.०० | १८.०० |
| ३) | शिक्षण शुल्क | रु. | १९२.०० | २१६.०० |
| ४) | ग्रंथालय शुल्क | रु. | ४०.०० | ३५.०० |
| ५) | जिमखाना क्रीडाशुल्क | रु. | २५.०० | २५.०० |
| ६) | महाविद्यालयीन वार्षिकांक शुल्क | रु. | २०.०० | २०.०० |
| ७) | प्रयोगशाळा शुल्क | रु. | ७०.०० | ७०.०० |
| ८) | आतंरिक परीक्षा शुल्क | रु. | १००.०० | १००.०० |
| ९) | ओळखपत्र | रु. | २०.०० | २०.०० |
| १०) | प्रयोगशाळा अनामत | रु. | २०.०० | २०.०० |
| ११) | सुरक्षा निधी | रु. | १०.०० | ......... |
| १२) | सायकल स्टँड | रु. | २०.०० | २०.०० |
| १३) | विद्यार्थी सहाय्यता निधी | रु. | १०.०० | १०.०० |
| १४) | विद्यार्थी-शिक्षकसंघनिधी | रु. | १०.०० | १०.०० |
| १५) | विकास निधी | रु. | २००.०० | २००.०० |

# अभ्यासक्रम – वरिष्ठ महाविद्यालय

## पदवी (बी.ए.)

**ब) अभ्यासक्रम : वाङ्मय शाखा :**

बी.ए. भाग १ च्या प्रथम सत्रात गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल. प्रत्येक तुकडीत प्रवेश घेताना विद्यार्थ्याला आवश्यक विषयाव्यतिरिक्त तीन ऐच्छिक विषय निवडण्याची मुभा असेल. २०१६–१७ या शैक्षणिक सत्रापासून रा.तु.म.नागपूर विद्यापीठाने बी.ए.भाग १ साठी सेमिस्टर/सत्र पद्धतीसुरु केली आहे. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. ह्या सत्रपद्धती नुसार होणाऱ्या परीक्षा व इतर सर्व माहितीसाठी महाविद्यालयात कार्यालयाशी संपर्कात रहावे.

बी.ए.द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना त्यांनी बी.ए. वर्षात/सत्रात घेतलेले विषयच घ्यावे लागतील. बी.ए. द्वितीय वर्षाला (तृतीयःचतर्थ सत्र) पर्यावरणशास्त्र हा विषय अनिवार्य राहिल.

**प्रवेशासाठी उपलब्ध विषय**

**आवश्यक विषय :** मराठी इंग्रजी

**ऐच्छिक विषय :** इंग्रजी वाङ्मय (ELT) मराठी वाङ्मय (MLT) राज्यशास्त्र समाजशास्त्र गृहअर्थशास्त्र अर्थशास्त्र इतिहास

## शिक्षण शुल्क

| अ.क्र. | विवरण | | शुल्क |
|---|---|---|---|
| १) | माहीतीपत्रक व प्रवेश अर्ज शुल्क | | ३०.०० |
| २) | शिक्षण शुल्क | | ८००.०० |
| ३) | गृहअर्थशास्त्र प्रात्यक्षिक शुल्क | | ६००.०० |
| ४) | सत्र शुल्क | | ७६०.०० |
| | १) ग्रंथालय शुल्क | २००.०० | |
| | २) जिमखाना/क्रीडाशुल्क | २४०.०० | |
| | ३) सांस्कृतिक व इतर शुल्क | ८०.०० | |
| | ४) वैद्यकीय शुल्क | ४०.०० | |
| | ५) शारीरिक क्षमता चाचणी शुल्क | ४०.०० | |
| | ६) विद्यार्थी सहाय्यतानिधी | ६०.०० | |
| | ७) वार्षिकांक शुल्क | १००.०० | |
| **महाविद्यालयीन शुल्क** | | | |
| ५) | ग्रंथालय शुल्क | | ५०.०० |
| ६) | परीक्षा शुल्क (महाविद्यालयीन आंतरिक शुल्क) | | १००.०० |
| ७) | ओळखपत्र | | २०.०० |
| ८) | सुरक्षा निधी | | १०.०० |
| ९) | प्रात्यक्षिक शुल्क (गृहअर्थशास्त्र) | | २०.०० |
| १०) | सायकल स्टँड | | २०.०० |
| ११) | वार्षिकांक शुल्क | | २०.०० |
| १२) | विकास निधी शुल्क | | २००.०० |

**विद्यापीठ शुल्क**

| अ.क्र. | विवरण | शुल्क |
|---|---|---|
| १) | वार्षिक शुल्क | १२५.०० |
| २) | नामांकन शुल्क | ११०.०० |
| ३) | इतर सुविधा शुल्क | ५०.०० |
| ४) | विद्यापीठ क्रिडा शुल्क सांस्कृती | २५.०० |
| ५) | अश्वमेघ शुल्क | ३०.०० |
| ६) | वैद्यकीय मदतनीधी | ५.०० |
| ७) | विद्यार्थी कल्याण निधी | ५.०० |
| ८) | विद्यार्थी संघ शुल्क | ५.०० |
| ९) | विद्यार्थी सहाय्यता निधी | ५.०० |
| १०) | वैद्यकीय तपासणी फार्म शुल्क | ५.०० |
| ११) | आपत्ती व्यवस्थापन शुल्क | १०.०० |
| १२) | पर्यावरण शुल्क | १००.०० |
| १३) | स्थलांतरण शुल्क | ५००.०० |
| १४) | अव्यावसायिक स्थलांतरण | २००.०० |

**महाविद्यालयातील प्रवेशाचे अर्ज :**

महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी कार्यालयातून माहितीपत्रकासह प्रवेश अर्ज विकत घेणे आवश्यक आहे. प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी माहितीपत्रकातील माहिती काळजीपूर्वक वाचावी. विद्यार्थ्याने आवेदन पत्र स्वतःच्या हस्ताक्षरात व्यवस्थित भरावे, खोडतोड करु नये. अर्जावर जन्मदाता किंवा पालकाची स्वाक्षरी घेऊन स्वतःच्या पासपोर्ट आकाराच्या छायाचित्राच्या २ प्रती व पुढे नमूद केलेल्या दाखल्यांसह प्राचार्यानी प्रवेशासाठी नियुक्त केलेल्या समिती समोर प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रवेश अर्जात चुकीची अथवा अपुरी माहिती दिली असल्यास प्रवेश अर्ज स्वीकारले जाणार नाही.

**प्रवेशाची अंतिम तिथी** – इयत्ता ११ वी, १२ वी व पदवी वर्गातील निकाल घोषित झाल्यापासून १५ दिवसाचे आत अर्ज करुन प्रवेश घ्यावा.

**प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

अ) शाळा–महाविद्यालय सोडल्याचा दाखल (Leaving Certificate) मूळ प्रतीसह तीन झेरॉक्स प्रतीत सादर करावा.

ब) गुणपत्रिकेच्या मूळ प्रतीसह तीन झेरॉक्स प्रती जोडाव्या.

क) वर्ग १० वी च्या गुणपत्रिकेची झेरॉक्स (३ प्रतीत) जोडावी

ड) स्थलांतर दाखला (Migration Certificate)

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ किंवा रा.तु.म. नागपूर विद्यापीठ यांच्या कक्षेबाहेरची कोणतीही परीक्षा उर्त्तीर्ण होऊन महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी उमेदवाराला योग्यता प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे लागेल.

**इ) विद्यापीठ नामांकन (University Enrolment)**

रा.तु.म.नागपूर विद्यापीठात प्रथम दाखल होणाऱ्या विद्यार्थ्याला आपले नामांकन आवेदन पत्र (Enrolment Form) रु.११०/– नामांकन शुल्कासह महाविद्यालयात सादर करावे लागेल. अन्यथा प्रत्येक महिन्याला रु.१०० विलंब शुल्क द्यावे लागेल. त्यानंतर विद्यापीठ कोणतेही कारण असले तरी नामांकन पत्र स्वीकारणार नाही. दिलेल्या मुदतीत नामांकन पत्र सादर न केल्यास त्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

**विद्यार्थ्यांची उपस्थिती**

शिक्षण मंडळ व विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्याची प्रत्येक विषयाची वर्गातील उपस्थिती १०० टक्के असली पाहिजे. आजार, क्रीडा स्पर्धा इत्यादी काही अपरिहार्य कारणांमुळे विद्यार्थी अनुपस्थित असल्यास महाविद्यालय जास्तीत जास्त २५ टक्के सूट विद्यार्थ्यांना देवू शकेल. परंतु शेकडा ७५ टक्क्यापेक्षा कमी उपस्थिती असल्यास महाविद्यालय विद्यार्थ्यांना कोणत्याही कारणास्तव सूट देणार नाही. अशा विद्यार्थ्यांना बोर्ड/विद्यापीठ परीक्षेस बसता येणार नाही. अनुपस्थितीबद्दल प्राचार्यांकडे रीतसर अर्ज करावा.

**महाविद्यालयीन परीक्षा**

महाविद्यालयीन परीक्षा समितीने नियोजित केलेल्या तारखेनुसार शैक्षणिक सत्रात एक सराव परीक्षा घेण्यात येईल. या परीक्षेत विनाकारण गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रती विषय १० रु. प्रमाणे दंड द्यावा लागेल. वैद्यकीय सबबीवर परीक्षेस अनुपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांनी नंतर प्रश्नपत्रिका सोडवून संबंधित प्राध्यापकांकडून तसा दाखला आणावा. त्याशिवाय परीक्षेसंबंधीचा दंड माफ होणार नाही. फक्त इयत्ता ११ वी १२ वी साठी दोन चाचणी परीक्षा व दोन सत्र परीक्षा होतील.

**परीक्षेचे संभाव्य महिने पुढीलप्रमाणे**

पदवी वर्गाच्या सराव परीक्षा फेब्रुवारी २०१९ मध्ये होईल. ११ वी साठी प्रथम सत्र परीक्षा ऑक्टोंबर २०१८ पासून तसेच १२ वी ची चाचणी परीक्षा फेब्रुवारी २०१९ च्या पहिल्या आठवडयात घेण्यात येईल.तत्पुर्वी विद्यार्थ्यांना पर्यावरण व इतर विषयाचे प्रकल्प विहित वेळेत सादर करुन तोंडी परीक्षेला देखील विद्यार्थ्यांची उपस्थिती अनिवार्य राहील.

बोर्ड/विद्यापीठ परीक्षांचे नियम व त्यासाठी भराव्या लागणाऱ्या आवेदन पत्रासंबंधिची सर्व माहिती, सूचनाफलकावर वेळोवेळी लावण्यात येत असते. यावर विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे.

**राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) :**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाची राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस) १९७५-७६ पासून महाविद्यालयात सुरु झालेली आहे या योजनेत बी.ए.च्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल. तसेच ११ वी व १२ च्या कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल. रासेयोत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्याला १२० तास पूर्ण करावे लागतील. त्याप्रमाणे श्रमसंस्कार शिबिरात सहभागी व्हावे लागेल. अधिक माहितीसाठी वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी प्रा. अनंत रिंढे व कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी प्रा. रत्नाकर चोरे या कार्यक्रमाधिकाऱ्याशी संपर्क करावा.

**महिला अध्ययन व सेवा केंद्र :**

निरंतर प्रौढ शिक्षण व विस्तार सेवा विभाग रा.तु.म.नागपूर विद्यापीठाच्या निर्देशानुसार महाविद्यालयात महिला अध्ययन व सेवा केंद्र हा उपक्रम राबविण्यात येतो. या अंतर्गंत व्यावसायिक व उपक्रमशीलतेच्या दृष्टीकोनातून मुलींसाठी महाविद्यालयात विविध कार्यशाळा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले जातें- यासाठी पदवीचे विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी होवू शकतात. अधिक माहितीसाठी प्रा. डॉ. अंजली हुमने कार्यक्रमाधिकारी, महिला अध्ययन व सेवा केंद्र यांचेशी संपर्क साधावा.

**शारीरिक शिक्षण :**

जे विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी होणार त्यांना महाविद्यालयातर्फे घेण्यात येणाऱ्या शारीरिक शिक्षण वर्गामध्ये रहाणे अनिवार्य आहे. विद्यापीठ परीक्षेला पात्र ठरण्यासाठी शारीरिक शिक्षण वर्गामध्ये ७५ टक्के उपस्थिती आवश्यक आहे. शारीरिक चाचणी परीक्षा तसेच वैद्यकीय तपासणीस हजर असणे अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी डॉ. अर्चना फाळके -डहाणे यांचेशी संपर्क साधावा.

**विद्यार्थी परिषद**

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ व विद्यापीठाच्या आदेशानुसार महाविद्यालयात विद्यापीठ परिषदेचे गठन केले जाईल.

**सांस्कृतिक उपक्रम :**

सांस्कृतिक उपक्रमाअंतर्गंत २०१८-१९ या शैक्षणिक सत्रात पुढील स्पर्धा जसे- चर्चासत्र, परिसंवाद, व्याख्यान आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, वाचन प्रेरणा दिनानिमित्त काव्यवाचन व गद्य, सुविचार वेचे वाचन स्पर्धा, सामान्यज्ञान स्पर्धा, आंतर महाविद्यालयीन कविता वाचन स्पर्धा, भावगीत स्पर्धा, पुष्परचना स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, नृत्य स्पर्धा, मेहंदी आरेखन स्पर्धा, पाककला स्पर्धा आयोजित केल्या जातील.

**पारितोषिके**

१) स्व. श्री. दौलतराव राऊत ह्यांचे स्मृतीप्रित्यर्थ श्री.पांडूरंगजी राऊत ह्यांचे कडून, वाङ्मय स्नातक परीक्षेत एकाच प्रयत्नात, महाविद्यालयातून सर्वाधिक गुण प्राप्त केल्या बद्दल.

२) स्व.श्री.रामचंद्रराव ढांगे ह्यांचे स्मृतीप्रित्यर्थ, स्व. श्री.जगन्नाथराव ढांगे ह्यांचे कडून, वाङ्मय स्नातक परीक्षेत एकाच प्रयत्नात महाविद्यालयातून सर्वाधिक गुण प्राप्त केल्या बद्दल.

३) स्व.श्री. रामचंद्रराव अहेर स्मृतीप्रित्यर्थ, डॉ. के.आर. अहेर ह्यांचे कडून वाङ्मय, स्नातक परीक्षेत सहकार विषयात, एकाच प्रयत्नात महाविद्यालयातून सर्वाधिक गुण प्राप्त केल्या बद्दल.

४) स्व. श्रीमती सायंकाबाई एम.नाथे ह्यांचे स्मृतीप्रित्यर्थ श्री.पी.एम.नाथे ह्यांचे कडून वाङ्मय स्नातक परीक्षेत फॅशन डिझाइनिंग विषयात प्रथम प्रयत्नात सर्वाधिक गुण मिळविण्या बद्दल.

५) स्व. श्री. के. व्ही. दीक्षित व स्व.श्री. डी. पी.चाफले ह्यांचे स्मृतीप्रित्यर्थ स्व. डॉ. के. के दीक्षित ह्यांचे कडून वाङ्मय स्नातक परीक्षेत एकाच प्रयत्नात 'इंग्रजी' व 'इंग्रजी साहित्य' विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केल्या बद्दल

६) पदवी वर्गातून शिक्षण घेणाऱ्या आणि ग्रंथालयात नियमित वाचन करणाऱ्या विद्यार्थ्याला दरवर्षी 'उत्कृष्ट वाचक पुरस्कार' सेवानिवृत्त ग्रंथालय प्रा. प्रकाश नाथे यांच्या कडून रुपये ५००/- चे रोख पारितोषिक दिले जाते.

७) स्व. श्री. रामचंद्रावजी ढांगे याचे स्मृतीप्रित्यर्थ स्व.श्री. जगन्नाथरावजी ढांगे, जनरल सेक्रेटरी य. ग्रा. शि. संस्था, वर्धा याचेकडून उ. मा. शा. प्रमाणपत्र परीक्षेत मागसवर्गीयातून सर्वाधिक गूण प्राप्त केल्याबद्दल.

८) स्व. श्री. खुशालराव आडकोजी जाधव यांचे स्मृतीप्रित्यर्थ प्रा. नरेंद्र के.जाधव यांचेकडून उ. मा. शा. प्रमाणपत्र परीक्षेत सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल.

९) स्व. श्री. वेंकटराव माणिकराव निर्मल यांचे स्मृतीप्रित्यर्थ प्रा. सौ. के. बी. येंगडे यांचे कडून परीक्षेत सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल.

१०) स्व. श्री. कवडूजी इरुटकर यांचे स्मृतीप्रित्यर्थ श्री. माधवराव के. इरुटकर यांचे कडून वाणिज्य शाखेतून परीक्षेत सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल.

११) स्व. श्री. एकनाथराव धोटे यांचे स्मृती प्रित्यर्थ प्रा.श्री.अजित ए.धोटे यांचे कडून उ.मा.शा.प्रमाणपत्र परीक्षेत सहकार या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल

१२) स्व. श्री. बाळकृष्णराव मसने यांचे स्मृतीप्रित्यर्थ प्रा.कु.एम.एस.सावध यांचे कडून परीक्षेत वस्त्रशास्त्र या विषायात सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल.

१३) स्व. श्री. अजाबराव केचे यांचे स्मृतीप्रित्यर्थ प्रा. श्री. गजानन ए. केचे यांचे कडून उ.मा.शा.प्रमाणपत्र परीक्षेत मराठी या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल.

१४) स्व. श्री. दिनकरराव पांडे यांचे स्मृतीप्रित्यर्थ प्रा. श्री. प्रफुल्ल एम. बन्सोड यांचे कडून तसेच प्रा. श्री. सी. बी. देशमुख यांचे कडून उ.मा.शा. परीक्षेत इंग्रजी या विषयात सार्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल.

१५) स्व. श्री. नितिन बबनराव झाडे यांचे स्मृतीप्रित्यर्थ श्री. बबनराव झाडे यांचे कडून तसेच प्रा. ए. व्ही. चनेकर यांचे कडून उ.मा.शा. प्रमाणपत्र परीक्षेत इतिहास या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल.

१६) प्रा. श्री. गजानन डी. देशमुख यांनी दिलेल्या देणगीतून उ.मा.शा.प्रमाणपत्र परीक्षेत राज्यशास्त्र या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल

१७) स्व. श्री. मोतीरामजी पुनाजी नाथे स्मृतीप्रित्यर्थ प्रा. प्रकाश एम. नाथे यांचे कडून परीक्षेत माहिती तंत्रज्ञान (I.T.) या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल.

१८) प्रा. श्री. देवराव पी. चव्हाण व प्रा. श्री. सुरेश राऊत यांचे कडून उ.मा.शा. प्रमाणपत्र परीक्षेत अर्थशास्त्र या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल.

१९) स्व. श्री. राम एम. हूमणे यांचे स्मृतीप्रित्यर्थ प्रा. अंजली हूमणे कडून वाणिज्य शाखेतून पुस्तक लेखाकर्म (B.K.) व सचिवाची कार्यपद्धती (S.P.) या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल.

२०) प्रा. श्री. नरेंद्र के. जाधव यांचे कडून उ.मा.शा.प्रमाणपत्र परीक्षेत वाणिज्य शाखेतून व्यापार संघटन (O.C.) या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल.

२१) प्रा. सतीश ओंकारसिंह रघुवंशी यांच्याकडून प्राप्त झालेल्या देणगी रूपातील रकमेच्या व्याजातून दरवर्षी अर्थशास्त्र विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल व वरिष्ठ महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्याला आर्थिक मदत देण्यात येईल.

**ग्रंथालय :**

महाविद्यालयीन क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त विविध विषयांवरील उपयुक्त ग्रंथांनी सुसज्ज ग्रंथालय आहे. ग्रंथालयात इंग्रजी, मराठी, हिंदी, वर्तमानपत्रे व मासिके, संशोधन पत्रिका नियमितपणे येत असतात. विद्यार्थ्यांमध्ये विद्याव्यासंग व ज्ञानवृद्धी निर्माण व्हावी यादृष्टीने वाचनकक्ष व अभ्यासिकेची व्यवस्था ग्रंथालयात उपलब्ध आहे.

**गणवेश :**

वर्ग ११ व १२ कला, वाणिज्य व विज्ञान तसेच बी. ए. पदवीच्या विद्यार्थ्यांनी निश्चित केलेल्या गणवेशातच महाविद्यालयत उपस्थित राहावे.

**ओळखपत्र :**

महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ स्वतःसंबंधी माहिती देणारे ओळखपत्र असणे आवश्यक आहे. त्याकरिता स्वतःच्या पासपोर्ट साईज छायाचित्रासह ओळचपत्र तयार करुन घ्यावे.

**सूचना फलक :**

महाविद्यालयातील सूचना फलकाचे वाचन करणे विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे. प्रवेश शैक्षणिक शुल्क, शिष्यवृत्ती, इतर सवलत, महाविद्यालयीन परीक्षा, बोर्ड व विद्यापीठ परीक्षा, विविध उपक्रम स्पर्धा व अन्य बाबींसंबंधी पूर्ण महिती सूचनाफलकावर लावण्यात येत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सूचना फलकाकडे नियमितपणे लक्ष द्यावे.

**यशःश्री वार्षिकांक**

विद्यार्थ्यांच्या लेखन व साहित्यभिरुचीस चालना देण्यासाठी ‘यशःश्री’ हा विशेषांक महाविद्यालया तर्फे दरवर्षी प्रकाशित केल्या जातो. यामध्ये विद्यार्थ्यांना ललित साहित्यासोबतच अभ्यासक्रमपुरक लेखन, छायाचित्र, चित्रकला इत्यादी घटकांना योग्य ते स्थान दिले जाते. यासाठी विद्यार्थ्यांनी प्रा. वसंत राठोड व प्रा. गजानन केचे यांचेशी संपर्क साधावा.

**शिस्तपालनाचे महत्वाचे नियम :**

विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिस्तीचे काटेकोरपणे पालन करणे अत्यावश्यक आहे. बेजाबदार वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांना कडक शासन होईल व नियम न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. ५०/- दंड आकारण्यात येईल.

- प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या नियमाचे पालन करावे.
- महाविद्यालयीन परिसरात धुम्रपानाची व तांबुल सेवनाची सक्त मनाई असून मोबाईल वापरण्यासाठी मनाई आहे.
- विद्यार्थ्यांनी वर्गात नियमितपणे हजर असावे. परवानगीशिवाय मध्यंतरी वर्ग सोडून जावू नये.
- प्राचार्यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही विद्यार्थ्याला कसलीही माहिती जाहिरात, फलक इत्यादी सूचना फलकांवर अथवा परिसरात लावता येणार नाही.
- अनुपस्थिती, वाईट वर्तन व परीक्षा न देणे या आधारावर विद्यार्थ्यांचे नाव महाविद्यालयातून काढले जाईल.
- कार्यालयीन कामाच्या दिवशी सकाळी १०.०० ते १.०० व दुपारी २.०० ते ४.०० वाजेपर्यंत रोख रक्कम स्वीकारली जाईल व चवथ्या शनिवारी कार्यालय बंद राहील. कार्यालयीन कामकाजाच्या वेळा सकाळी १०.३० ते २.०० व दुपारी २.३० ते ५.३० राहील
- बोनाफाईड सर्टिफीकेट रेल्वे बस कन्सेशन, कॉलेज लिव्हींग सर्टीफिकेट यासाठी विद्यार्थ्यांनी दोन दिवस पूर्वीच अर्ज करावा.
- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना गणवेश व ओळखपत्राशिवाय महाविद्यालयात प्रवेश करता येणार नाही.
- उपरोक्त नियमांव्यतिरिक्त इतर बाबींविषयी निर्णय घेण्याचे अधिकार प्राचार्यांना राहील.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अभ्यासकेंद्र यशवंत महाविद्यालय, सेलू**

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिकचे अभ्यासकेंद्र महाविद्यालयात २००६ पासून असून दरवर्षी सुमारे २५० ते ३०० विद्यार्थी त्याचा लाभ घेतात. या विद्यापीठाच्या बी.ए.व बी.कॉम पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जातो. फक्त रविवार व सुट्टीच्या दिवशी वर्ग होतात. विद्यापीठाची पदवी इतर विद्यापीठाच्या समकक्ष गणली जात असल्यामुळे सोयी सवलती व संधी याही विद्यार्थ्यांना मिळतात.

मुक्त विद्यापीठात प्रवेश व अधिक माहिती करिता केंद्र संयोजक प्रा. प्रकाश नाथे व केंद्र संयोजक श्री.राजेंद्र फुसे यांच्याशी संपर्क साधावा.

**महाविद्यालयाचे वर्ग :**

पदवी वर्गाचे/ तास सोमवार ते शनिवार सकाळ पाळीत होतील, तर ११ वी व १२ कला व वाणिज्य शाखेचे तास सोमवार ते शनिवार दुपार पाळीत आणि ११ वी १२ वी विज्ञान शाखेचे तास सकाळ पाळीत होईल.

**प्रथम सत्र १५ जून २०१८ पासून सुरु होईल.**

**सवलत व शिष्यवृती**

अभ्यासक्रमासाठी पुढे नमूद केलेली शासकीय शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क सवलत उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांच्या सदाचरणावर, शैक्षणिक प्रगतीवर शासकीय मदत अवलंबून आहे. प्राचार्यांचा जर याबाबतीत असमाधान कारक शेरा असेल, तर या सवलती रद्द करण्याचा अनुदान मंडळाला पूर्ण अधिकार आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांनी बेशिस्त, संप, गैरहजेरी आणि अभ्यासाकडे दुर्लक्ष या अवगुणांपासून अलिप्त असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | सवलत/शिष्यवृत्तीचे नाव | सवलत/शिष्यवृत्ती प्राप्त करण्यासाठी आवश्यक पात्रता | | अंतिम तिथी | आवेदन पत्रासोबत जोडावयाचे दाखले |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ |
| १. | आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीयांसाठी सवलत (इ.बी.सी.) | १ | महाराष्ट्र प्रमाणित रहिवासी असावा | प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसाचे आत | महाविद्यालयाच्या कार्यालयातून आवेदन पत्र विकत घेऊन त्या सोबत वडिल/पालक यांच्या मागील वर्षाच्या उत्पन्नाच्या दाखल्याच्या दोन प्रती जोडाव्या. |
| | | २ | वडिलांचे किंवा पालकांचे मागील वर्षातील सर्व मार्गापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.१५०००/- च्या आत असावे. | | |
| | | ३ | प्रवेश पात्रता परीक्षेत विद्यार्थी मागील वर्षी उत्तीर्ण झालेला असावा. | | |
| २. | १२ वी पर्यंत मुलींना फी माफीची सवलत (ई.बी.सी.) | १ | महाराष्ट्राचा प्रमाणित रहिवासी असावा. | प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसाचे आत | विहित प्रपत्रात अर्ज |
| | | २ | वडिलांचे किंवा पालकांचे मागील वर्षातील सर्व मार्गापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न रू. १५०००/- च्या आत असावे. | | |
| | | ३ | प्रवेश पात्रता परीक्षेत विद्यार्थी मागील वर्षी उत्तीर्ण झालेला असावा. | | |
| ३. | प्राथमिक शिक्षकांच्या मुलामुलींना फी माफीची सवलत | १ | मुलामुलीचे आई/वडील प्राथमिक शाळेत पूर्ण वेळ शिक्षक असावेत. | प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसाचे आत | नोकरीच्या प्रमाणपत्राच्या दोन प्रतीसह विहित प्रपत्रात अर्ज |
| | | २ | मागील वर्गात विद्यार्थी नापास नसावा | | |
| ४. | प्राथमिक/ माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या मुलांना शिष्यवृत्ती | | आई/वडील प्राथमिक/माध्यमिक शाळेत पूर्ण वेळ शिक्षक असावेत | निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसाचे आत | आई/वडीलांच्या उत्पन्नाचा दाखला व नोकरीबाबत प्रमाणपत्र विहीत प्रपत्रात अर्ज व अपत्याचा आई / वडिलांचा दाखला. |
| ५ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना मिळणारी शिष्यवृत्ती. | १ | आई/वडील/पालक यांनी १ महिन्यापेक्षा कमी तुरूंवास भोगलेला नसावा. | | |
| | | २ | वार्षिक परीक्षेत विद्यार्थ्यांना ६०% किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळले असावे. | | |
| ६. | राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना | | SSC / HSC परीक्षेत ६०% पेक्षा अधिक गुण | | विहित प्रपत्रात अर्ज गुणपत्रिकेच्या सत्यप्रतिलिपीसह |
| ७. | राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | | SSC/HSC परीक्षेत ६०% अधिक गुण प्राप्त केलेला विद्यार्थी इतर शैक्षणिक सवलती प्राप्त करू शकतो. | | विहित प्रपत्रात अर्ज गुणपत्रिकेच्या सत्यप्रतिलिपीसह |
| ८. | GOI शिष्यवृत्ती - अनुसूचित जाती जमाती व मागासलेला वर्ग (SC/ST/VJ/NT/OBC) | १ | विद्यार्थी वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा. | | विहित प्रपत्रात अर्ज Entitlement Card & Agreement form in duplicate |
| | | २ | भारत सरकारची शिष्यवृत्ती SC/ST च्या विद्यार्थ्यांसाठी रु. २ लाखाच्या आत व NT, SBC, OBC यांना रु. १ लाख चे आत वार्षिक उत्पन्न असावे. | | |
| ९. | अपंग विद्यार्थी शिष्यवृत्ती | १ | जन्मदात्याचे उत्पन्न रु. ३६०० पेक्षा जास्त नसावे. | | विहित प्रपत्रात गुणपत्रिकेसह अर्ज |
| | | २ | शारीरिकदृष्ट्या अपंग आहे दर्शविणारा सिव्हिल सर्जन किंवा अधिकृत डॉक्टरांचा दाखला | | |
| १०. | अल्पसंख्यांक मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | १ | अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. | | विहित प्रपत्रात उत्पन्नाच्या दाखल्यासह अर्ज |
| | | २ | मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के गुण घेवून उत्तीर्ण झालेला असावा. | | |
| | | ३ | अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा लाभार्थी नसावा. | | |
| | | ४ | अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २ लाख इतकी आहे. | | |
| | | ५ | एका कूटूंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनोचा लाभ घेता येईल. | | |

# प्रवेश समिती २०१८-२०१९
## कनिष्ठ महाविद्यालय

### कला शाखा

| | | |
|---|---|---|
| वर्ग ११ अ | प्रा. एस. ए. इंगोले | प्रा. ए. डी. मसने |
| वर्ग ११ क | प्रा. व्ही. एस. वैरागडे | प्रा. एस. एन. चामचोर |
| वर्ग ११ इ | प्रा. ए. व्ही. चनेकर | प्रा. पी. एम. बन्सोड |
| वर्ग १२ अ | प्रा. ए. डी. मसने | प्रा. एस. ए. इंगोले |
| वर्ग १२ क | प्रा. पी. एम. बन्सोड | प्रा. ए. व्ही. चनेकर |

| | | |
|---|---|---|
| वर्ग ११ ब | प्रा. आर. एम. चोरे | प्रा. पी. एन. फरकाडे |
| वर्ग ११ ड | प्रा. एस. एन. देशमुख | प्रा. एम. टी. राऊत |
| वर्ग ११ वा ए.टी.के.टी. प्रवेश | प्रा. जी. जी. राठोड | |
| वर्ग १२ ब | प्रा. पी. एन. फरकाडे | प्रा. व्ही. एस. वैरागडे |
| वर्ग १२ ड | प्रा. एम. टी. राऊत | प्रा. जी. जी. राठोड |

### वाणिज्य शाखा

| | | |
|---|---|---|
| वर्ग ११ व १२ अ/ब | प्रा. एन. के. जाधव | प्रा. पी. डी. ठाकरे |

### विज्ञान शाखा

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वर्ग ११ व १२ | प्रा. सी. बी. देशमुख | प्रा. एस. व्ही. बुरडे | प्रा. व्ही. एस. शिंदे | प्रा. एस. डी. ठाकरे | प्रा. व्ही. बी. हिंगे |

# प्रवेश समिती २०१८-२०१९
## वरिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| बी. ए. प्रथम व द्वितीय सत्र | | |
| प्रा. ए. आर. हुमणे | प्रा. ए. ए. रिंढे | प्रा. डॉ. एस. बी.काळे |
| बी. ए. तृतीय व चतुर्थ सत्र | | |
| प्रा. ए. एस. डहाणे | प्रा. व्ही. पी. खोरगडे | डॉ. एस. जी. डायगव्हाणे |
| बी. ए. पाचवे व सहावे सत्र | | |
| प्रा. व्ही. डी. राठोड | प्रा. ए. एन. खोब्रागडे | |

# माहितीपत्रक समिती
## सत्र २०१८-१९

| | | |
|---|---|---|
| प्रा. व्ही. डी. राठोड | प्रा. डॉ. आर. डी. मुंढे | प्रा. डॉ. ए. आर. हुमणे |
| प्रा. ए. एन. खोब्रागडे | प्रा. डी. पी. चव्हाण | प्रा. जी. ए. केचे |
| प्रा. सी. बी. देशमुख | प्रा. सौ. ए. डी. मसने | प्रा. एस. एन. चामचोर |

## उच्च विद्याविभूषित प्राध्यापक : वरिष्ठ महाविद्यालय

| अ.क्र. | नाव | विषय | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | **डॉ. व्ही. आर. बोबडे, प्राचार्य** | राज्यशास्त्र | एम. ए. (राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र), बी.एड.ए एम.फिल, पीएच.डी. |
| २ | डॉ. ए. आर. हुमणे | गृहअर्थशास्त्र | एम.ए. (गृहअर्थशास्त्र) |
| ३ | प्रा. व्ही. डी. राठोड | मराठी | एम.ए. (मराठी) बी.एड्. |
| ४ | डॉ. ए. एस. डहाणे | शा. शिक्षक | एम. पी. एड, नेट पीएच. डी. |
| ५ | प्रा. ए. एन. खोब्रागडे | इंग्रजी | एम. ए. (इंग्रजी) सेट |
| ६ | डॉ. आर. डी. मुंढे | मराठी | एम. ए. (मराठी), बी.एड., सेट, पीएच. डी. |
| ७ | प्रा. ए. ए. रिंढे | इतिहास | एम. ए. (इतिहास) एम. फिल. |
| ८ | प्रा. व्ही पी. खोरगडे | इंग्रजी | एम. ए. (इंग्रजी) सेट. |
| ९ | डॉ. एस. जी. डायगव्हाणे | गृहअर्थशास्त्र | एम. ए. (गृहअर्थशास्त्र) पीएच. डी. |
| १० | डॉ. एस. बी. काळे | राज्यशास्त्र | एम. ए. (राज्यशास्त्र) पीएच. डी. |
| ११ | डॉ. आर. एस. बकाणे | ग्रंथपाल | एम. लिब, पीएच. डी. |

## उच्च विद्याविभूषित प्राध्यापक : कनिष्ठ महाविद्यालय

| अ.क्र. | नाव | विषय | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | सौ. ए. डी. मसने | आहारशास्त्र | एम. ए. (गृहअर्थशास्त्र) बी. एड. |
| २ | सौ. एस. ए. इंगोले | वस्त्रशास्त्र | एम. ए. (गृहअर्थशास्त्र) बी. एड. |
| ३ | श्री. जी. ए. केचे | मराठी | एम. ए. (मराठी) बी. एड. |
| ४ | श्री. डी. पी. चव्हाण | अर्थशास्त्र | एम. ए. (अर्थशास्त्र) बी. एड. |
| ५ | श्री. आर. एम. चोरे | राज्यशास्त्र | एम. ए. (राज्यशास्त्र समाजशास्त्र) बी. एड. |
| ६ | श्री. पी. एम. बन्सोड | इंग्रजी | एम. ए. (इंग्रजी) बी. एड. |
| ७ | श्री. सी. बी. देशमुख | इंग्रजी | एम. ए. (इंग्रजी) बी. एड. |
| ८ | कु. ए. व्ही. चनेकर | इतिहास | एम. ए. (इतिहास) बी. एड. |
| ९ | श्री. एन. के. जाधव | वाणिज्य | एम. कॉम, बी. एड, एम. फिल. |
| १० | श्री. पी. एन. फरकाडे | अर्थशास्त्र | एम. ए. (अर्थशास्त्र, राज्यशास्त्र) बी. एड. |
| ११ | श्री. एस. के. धनुले | सहकार | एम. ए. (अर्थशास्त्र) एम. कॉम, बी. एड. |
| १२ | श्री. एस. एन. चामचोर | शारीरिक शिक्षण | एम. ए. (समाजशास्त्र) एमपी. एड. |
| १३ | कु. एस. एन. देशमुख | अर्थशास्त्र | एम. ए. (अर्थशास्त्र, समाजशास्त्र) बी. एड. |
| १४ | श्री. पी. डी. ठाकरे | वाणिज्य | एम. कॉम., बी. एड. |
| १५ | श्री. जी. डी. राठोड | इतिहास | एम. ए. (इतिहास) बी. एड. |
| १६ | कु. एम. टी. राऊत | मराठी | एम. ए. (मराठी) बी.एड. |
| १७ | श्री. व्ही. एस. वैरागडे | समाजशास्त्र | एम. ए. (समाजशास्त्र) बी. एड. |